ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

# इतिहास अध्यापनात प्रकल्प पध्दतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**डॉ. वैशाली पुंजाराम सूर्यवंशी,**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**विश्वसत्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**ओझर (मिग), ता. निफाड, जि. नाशिक.**

**१.१ प्रास्ताविक**

इतिहास म्हणजे जगातील मानवी प्रगतीचा आलेख होय. इति+ह आस या संधीपासून इतिहास हा एक शब्द बनला आहे. 'इति' म्हणजे असे, 'ह' म्हणजे हे, तर 'आस' म्हणजे घडले. असा इतिहास या शब्दाचा अर्थ होतो. थोडक्यात असे हे घडले ते जसेच्या तसे सांगणे, म्हणजे इतिहास होय किंवा असे ही सांगता येते काय? कधी? का? व कसे घडले, हे क्रमबध्द करून जसेच्या तसे सांगणे म्हणजे इतिहास होय. इतिहास म्हणजेच भूतकाळ व भूतकाळात घडून गेलेल्या घटना असाही अर्थ लावला जातो.

इंग्रजीमध्ये इतिहासाला Historyम्हणून संबोधले जाते. Historyहा शब्द His + Story. या शब्दापासून बनलेला आहे. Hisयाचा अर्थ येथे मानव तर Storyम्हणजेच अर्थ कथा असा लावलेला आहे. थोडक्यात His Story म्हणजेच मानवी जीवनाची कथा, अशी ही मानवी जीवनाची कथा ज्यात सामावलेली आहे त्याला इतिहास असे म्हणतात. जेव्हा सात अर्थतज्ज्ञ एकत्र येतात त्यावेळी आठ अर्थशास्त्राच्या परिपूर्ण व्याख्या तयार होतात. परंतु जेव्हा सात इतिहासतज्ज्ञ एकत्र येतात तेव्हा इतिहासाची एक परिपूर्ण व्याख्या बनविणे कठिण होते. काही इतिहास विद्वानांनी इतिहासावर सखोल अभ्यास करून काही व्याख्या तयार केलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे

१. हिरोडॉटस: 'इतिहास म्हणजे मनोरंजक व अविस्मरणीय अशा घटनांचा शोध'
(History means an enquiry into interesting and memorable past events)
२. प्रो. इ. एच. कार: "इतिहास म्हणजे वर्तमानकाळ व भूतकाळ यामधील कधीही न संपणारासंवाद होय-
(History is an unending dialogue between the past and the pressent)
३. फ्रान्सीस बेकन मानवाला शहाणा बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास होय.

मानवी जीवनाच्या विकासासाठी इतिहास हा एक मार्गदर्शक म्हणून उपयुक्त ठरत असतो. इतिहासाचा संबंध मनुष्याशी असतो. इतिहास जरी भूतकाळाशी संबंधित असला तरी या भूतकाळाचा मानवी वर्तनावर परिणाम होतो. या वर्तमानात भविष्याची बीजे रूजलेली असतात. वर्तमानकालीन समाजाच्या सर्व अंगाचे मूळ इतिहासातच असते. त्यासाठी इतिहासाचाअभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणून इतिहास या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

**१.२ इतिहास विषयाची व्याप्ती व नवीन संकल्पना**

मध्ययुगीन काळात युरोपमध्ये झालेली औद्योगिक क्रांती आणि या क्रांतीनंतर जगामध्ये झालेली वैचारिक क्रांती, या वैचारिक क्रांतीतून झालेली सामाजिक क्रांती आणि या सामाजिक क्रांतीबरोबरच घडून आल्या त्या विविध राज्यक्रांत्या. मग त्या राज्यक्रांत्यामध्ये इंग्लंडमधील रक्तहीन राज्यक्रांती असेल, अमेरिकन राज्यक्रांती असेल किंवा फ्रान्समधील फ्रेंच राज्यक्रांती असेल, रशियन राज्यक्रांती असेल किंवा भारतीय स्वातंत्र्यसंग्राम असेल. या सर्व क्रांत्यांमध्ये महत्वाची भूमिका पार पाडली ती सामान्यातल्या सामान्य माणसाने. वास्तविक क्रांती कोण करतो? ज्याचे पोट पूर्णपणे भरलेले आहे, अशी व्यक्ती, तर नाही असेच उत्तर मिळेल. तर ज्याचे पोट अर्धवट भरलेले आहे, ज्याला पोटभर अन्नाची शाश्वती नाही, ज्याला समाजाने नाकारलेले असते, जो उपेक्षित असतो, ज्याच्यावर सतत अन्याय-अत्याचार होत असतो, अशा ध्येयवादी सर्वसामान्य माणसाकडून, जगामध्ये ज्या ज्या क्रांत्या घडवून आणल्या गेल्या त्या त्या सर्व क्रांत्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली ती वर उल्लेख केलेल्या सामाजिक आर्थिक व राजकीयदृष्ट्या उपेक्षित असलेल्या सामान्यातल्या सामान्य माणसाने.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत राजा, राणी त्यांचा राज्यविस्तार आणि त्यांचा राज्यकारभार व राजधर्म एवढ्यापुरताच इतिहासाचा अभ्यास विषय गर्यादित होता. परंतु १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झालेले परिवर्तन आणि या परिवर्तनात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडणारा तसेच जगात घडून आलेल्या क्रांत्या, बंड, चळवळी आणि आंदोलने यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणारा सामान्य माणूस हाच जर या सर्व घटनांमागील प्रमुख केंद्रबिंदू असेल तर मग हा सामान्य माणूसच इतिहासाच्या अभ्यासाचा घटक का असू नये? असा जो विचार प्रवाह पुढे आला त्यातून राजा, राणी, त्यांचा विवाह, त्यांचा राज्यकारभार व राजधर्म हा भाग मागे पडून इतिहास घडवणारा सर्वसामान्य माणूस हाच इतिहासाच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू बनला. असा हा सर्वसामान्य माणूस दैनंदिन जीवन जगत असताना त्याचा ज्या ज्या क्षेत्राशी. ज्या ज्या अंगाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध आला ती ती सर्व अंगे इतिहासाच्या अभ्यासाचा भाग बनली. उदा. बौध्दिक, राजकिय, सामाजिक, भाषिक, वैज्ञानिक, भौगोलिक व आर्थिक क्षेत्रइत्यादी. थोडक्यात, राजा, राणी त्यांचे राज्य आणि त्यांचा राज्यकारभार एवढ्यापुरतेच इतिहासाच्या अभ्यासाचे स्वरूप मर्यादित न राहता इतिहास घडवणारा सर्व सामान्य माणूस व त्याचा दैनंदिन जीवन जगत असताना येणारी विविध अंगे आणि त्या अंगाचा एकूण मानवी जीवनावर होणारा परिणाम हाच इतिहासाच्या अभ्यासाचा विषय बनला व अशा प्रकारे इतिहासाची व्याप्ती वाढत गेली.

**१.३ प्रकल्प पध्दती पार्श्वभूमी**

इतिहास अध्यापनाच्या ज्या विविध अध्यापन पध्दती आहेत त्यातील ही एक महत्त्वाची अशी अध्यापन पध्दती आहे. या पध्दतीला इंग्रजीत प्रोजेक्ट (Project Method) पध्दत्त असे म्हणतात, तर तिला मराठीत प्रकल्प उपक्रम व योजना पध्दती म्हणतात. या पध्दतीची सर्वप्रथम संकल्पना मांडली ती सुप्रसिध्द

शिक्षण तत्ववेत्ते जॉन डयुई यांचे शिष्य किल पॅट्रिक यांनी. या पध्दतीचा उगम जॉन ड्यूई यांच्या कार्यवादात आढळून येतो. कार्यवादाने वैचारिक तत्त्वज्ञानापेक्षा प्रत्यक्ष कृतीस महत्त्व दिले आहे.

'व्यक्तीला किंवा मुलांना त्यांच्या उपजत बुध्दीप्रमाणे व त्यांच्या स्वतःच्या अंतःस्फूर्तीप्रमाणे कृती करण्यास पूर्ण स्वातंत्र्य दयावे व ती कृती यशस्वी होण्यास त्यांना आवश्यक वातावरण पुरवावे म्हणजे व्यक्तीला किंवा मुलांना उपयुक्त असा अनुभव मिळू शकेल" या त्यांच्या मतातूनच 'प्रकल्प पध्दती' उदयास आलेली आहे.

या पध्दतीचा प्रथम पध्दतशीर वापर व विकास कोलंबिया विद्यापीठाच्या शेती विभागात करण्यात आला. तिथे ही पध्दत यशस्वी व प्रभावी ठरल्यानंतर अन्य क्षेत्रात आणली गेली. भारताच्या संदर्भात या पध्दतीचा विचार करता ही पध्दत प्रथम स्थापत्य शास्त्रात वापरली गेली च तिथे ती यशस्वी ठरल्यानंतर अन्य शास्त्रात आणली गेली.

किल पॅट्रिक यांनी जरी ही पध्दत अस्तित्वात आणली असली तरी प्रत्यक्षात शिक्षण क्षेत्रात आणण्याचे महान कार्य केले ते किल पॅट्रिक यांचे गुरू जॉन ड्युई यांनी. या जॉन ड्युईनी विचारापेक्षा कृतीला फार महत्त्व दिले. कृती करत असताना व्यक्तीला जो प्रत्यक्ष अनुभव येत असतो तो अनुभवच व्यक्तीला खूप काळ उपयोगी पडतो. व्यक्तीला कृतीतून किंवा अनुभवातून जे शिक्षण मिळते, तेच खरे शिक्षण होय असे ते म्हणतात. विद्याथी ज्याकृती. प्रतिकृती व नमुने तयार करीत असतात. त्याकरिता ही शब्द योजना तयार करण्यात येऊलागली. नंतर विद्यार्थी ज्या उपक्रमांची योजना आखीत व ती कार्यान्वित करीत त्याला प्रोजेक्ट किंवा प्रकल्प म्हणण्यात येऊ लागले. प्रकल्प म्हणजे व्यक्तीने उद्दिपत होऊन केलेली कृती होय.

**१.३.१ प्रकल्प पध्दती परिभाषा / व्याख्या**

विविध विचारवंतांनी तयार केलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

१. "सामाजिक वातावरणात मनःपूर्वक हेतूतः साकारणारा उपक्रम म्हणजे प्रकल्प होय." किल पॅट्रिक
२. 'नैसर्गिक परिस्थितीत पूर्णतेस नेलेली समस्याप्रधान कृती म्हणजे प्रकल्प होय." स्टिव्हन्सन
३. विद्यार्थ्यांनी करावयाचे एखादे शैक्षणिक कार्य ज्यामध्ये समाविष्ट आहे. अशी अध्ययनकृती म्हणजे प्रकल्प होय." - पॅटसन
४. 'वर्गात आंशिक रूपाने आणलेले वास्तविक जीवन म्हणजे प्रकल्प होय. बिलार्ड
५. ज्यामध्ये रचनात्मक प्रयत्न किंवा विचार असतो आणि विषयनिष्ठ परिणामात ज्यांचे रूपांतर होते अशी स्वैच्छिक कृती म्हणजे प्रकल्प टॉमस व लॉग

वरील व्याख्यांवरून आपल्याला थोडक्यात असे सांगता येते की, या पध्दतीत प्रथम एखादा व्यवसाय, योजना किंवा उपक्रम निवडायचा नंतर त्याचे उद्दिष्ट निश्चित करायचे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोणती साधने, कोणती सामग्री वापरायची त्यांची नोंद करणे, त्यांची योग्य ती मांडणी करून त्या योजनेची समग्र कल्पना आखावयाची. थोडक्यात विद्यार्थ्यांना विचार प्रवण करून त्यांच्या कृतिशीलतेला वाव देणारी अशी ही

पध्दती आहे.

**१.३.२ प्रकल्प पध्दतीची उद्दिष्टे**

आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल की, इतिहासाच्या अध्यापनातून व एकूण शिक्षणातून उत्तम संस्कार आणि उत्तम नागरिक घडवावेत अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे. प्रकल्प पध्दतीतून विद्यार्थी इतिहास व अन्य शालेय विषयाच्या अध्ययनातून व या विषयाबरोबर मूल्यशिक्षण, संपर्क कौशल्ये शिकतात, अशी प्रकल्प पध्दतीची उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतात.

१. विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची सवय लावणे,
२. विद्यार्थ्यांना स्वतःच्या गतीनुसार व कुवतीनुसार अध्ययनाची संधी देणे.
३. विद्यार्थ्यांमधील निरीक्षण, निवेदन, संकलन इत्यादी कौशल्यांचा विकास करणे,
४. तर्कसंगत विचार करण्याची सवय लावणे,
५. विद्यार्थ्यांमधील कल्पकता, सृजनशीलता, संग्रहवृत्ती, श्रमप्रतिष्ठा, स्वयंशिस्त, चिकाटी व सौंदर्यदृष्टी इत्यादी गुणांचा विकास करणे,
६. विद्यार्थ्यांमधील वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, प्रसंगावधान, सहकार्य, संघभावना व शिष्टाचार पालन इत्यादी जीवनावश्यक कौशल्याचा विकास करणे.
७. विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणाविषयी प्रेम निर्माण करणे.
८. विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
९. चिकाटीने काम करण्याची सवय लावणे.
१०, शिक्षक व विद्यार्थी या दोघांनाही शिकायला मिळावे.

**१.३.३ प्रकल्प पध्दतीच्या पायऱ्या**

प्रकल्प पध्दतीच्या पायऱ्या खालीलप्रमाणे आहेत.

**१. प्रकल्पाची निवड**

या पायरीत विद्यार्थी प्रकल्प कोणता करावयाचा हे प्रथम निश्चित करतो. प्रकल्पासाठी एखादी समस्या किंवा प्रश्न असायलाच हवा असे नाही, तर एखादी क्रिया किंवा घटक घेऊन सुध्दा प्रकल्प करता येतो. परंतु याची निवड करताना ती अतिशय काळजीपूर्वक व विचार करून करावी. उदा. महात्मा गांधीचे विचार, एखादी वास्तु वा शस्त्रे तयार करणे, पध्दतशीर एखादी कृती करणे. (उदा. प्रदर्शन भरवणे) कलात्मक कृती करणे. उदा. नाटक बसवणे,

प्रकल्पाची निवड करताना शक्यतो शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रकल्प नेमून देऊ नये याचे कारण म्हणजेच असे केल्याने विद्यार्थ्यांना प्रकल्पाबाबत आत्मीयता व आत्मविश्वास वाटत नाही. प्रकल्प विषय निवडताना विद्यार्थ्यांच्या परिचयाचे, त्यांच्या विचारांना कृतीतून चालना देणारे असावेत. येथे मुलांचे वय व

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

कुवत विचारात घेतलेली असावी. शिवाय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आवश्यक तिथे प्रोत्साहन व मार्गदर्शन करावे.

**२. प्रकल्पाचे नियोजन**

प्रकल्प यशस्वी करण्यासाठी प्रथम नियोजनाची नितांत आवश्यकता असते, ठरविलेल्या विषयाची माहिती कशी जमा करायची, त्यात कोणत्या कृती येतील. त्यांचा क्रम काय असेल, प्रकल्पासाठी कोणती पूर्वतयारी करावी लागेल, कोणते साहित्य लागेल, ते कसे उपलब्ध होईल, एकूण किती खर्च येईल, एकूण किती वेळ लागेल, कामाची वाटणी कशी करावी याबाबतचा प्रथम नियोजन आराखडा तयार असायला हवा. प्रकल्पाची चर्चा यशस्वी होण्यासाठी प्रथम शिक्षकाजवळ नियोजनविषयक किमान दोन ते तीन आराखडे असायला हवेत.

**३. प्रकल्पाची कार्यवाही**

प्रकल्पाची कार्यवाही म्हणजे सुनियोजित जिवंत असा अध्ययन प्रसंग होय. कार्यवाही उरवलेल्या आराखाड्यानुसार व्हावी, कार्यवाही चालू असताना शिक्षकाने अत्यंत जागरूक राहून व विद्यार्थ्यांच्या कृतीचे बारकाईने निरीक्षण करून त्यांना जरूर तेथे मार्गदर्शन करावे.

**४. प्रकल्पलेखन व सादरीकरण**

प्रकल्प कार्याच्या यशाचे मूल्यमापन हा प्रकल्पाचा एक महत्त्वाचा घटक आहे. प्रकल्पाचे मूल्यमापन विद्यार्थी व शिक्षक या दोघांनी शक्यतो करावे. यात प्रकल्पाची कार्यवाही चालू असताना प्रकल्प कऱ्याला कोणकोणते प्रत्यक्ष अनुभव आले. या अनुभवातून कोणते निष्कर्ष निघतात, कोणत्या शिफारशी केल्या आहेत. त्यांचे उपयोजन कसे करावे इत्यादी घरकांवर प्रश्न विचारावेत.

**१.३.४ प्रकल्पाचे प्रकार**

प्रकल्पाचे निर्मितीप्रधान संग्रहात्मक, सर्वेक्षणात्मक, संशोधनात्मक असे अनेक प्रकार आहेत. ते पुढील प्रमाणे आहेत.

१. निर्मितीप्रधान प्रकल्प

या प्रकल्पाचा हेतू एखादी कल्पना अथवा योजना यांचा उपयोग करून एखादी वस्तू तयार करणे असा आहे. या प्रकल्पाला प्रतिकृतीरूप प्रकल्प असे सुध्दा म्हणतात. उदा. शिवकालीन युध्दकला, किल्ले, हडप्पाकालीन नगररचना रस्ते, इत्यादींच्या प्रतिकृती तयार करणे. सदर प्रतिकृती तयार करतांना चिखल, मेन, प्लॅस्टर ऑफ पॅरिस, कागद, थर्मोकोल इत्यादीचा वापर करता येतो. वस्तु तयार करताना अनेक प्रकारची माहिती गोळा करावलागते. त्या माहितीची जुळणी करावी लागते. माहितीचे विश्लेषण करावे लागते, मिळालेल्या माहितीपासून निष्कर्ष काढावे लागतात. उदा. हडप्पा कालीन नगररचनेची प्रतिकृती तयार केली तर नगररचेनत समाविष्ट असलेल्या भागांची नावे, त्यांची माहिती, त्यांचा क्रम इत्यादी सर्व माहिती गोळा करावी लागते.

२. संग्रहात्मक प्रकल्प

या प्रकल्प प्रकारात माहितीचे, वस्तूंचे आणि कल्पनांचे संकलन केले जाते. या प्रकल्पाचा मुख्य हेतू

ज्ञान मिळविणे हा असतो. यामध्ये विविध प्रकारची नाणी, पोस्टाची तिकिटे, शंख, शिंपले, खेळाचे साहित्य, दोन्यांचे प्रकार, धातूंचे नमुने, मातीचे नमुने, दगडाचे नमुने, दळणवळणाची साधने, विविध प्रकारचे दिवे, कापडाचे नमुने इत्यादींचा समावेश होऊ शकतो. उदा. दिव्यांच्या संग्रहामध्ये दिवटी, पणती, निरंजन, समई, मशाल तर कापडाच्या नमुन्यामध्ये सुती, रेशीम, खादी, लोकरी, टेरिकॉट अशा प्रकारच्या कापडाच्या नमुन्यांचा संग्रहकरता येईल.

३. सर्वेक्षण प्रकल्प

सर्वेक्षणात्मक प्रकारच्या प्रकल्पामध्ये विशिष्ट हेतूने विविध माध्यमातून माहितीचे संकलन करावयाचे असते. यात विद्यार्थ्यांना वेगवेगळी कौशल्ये वापरावी लागतात. उदा. मुलाखतीद्वारे माहिती मिळवायची असेल तर मुलाखत कौशल्य वापरावे लागेल. प्रश्न विचारण्यासाठी प्रश्नावली तयार करण्याचे कौशल्य, संभाषण कौशल्य वापरावे लागेल. उदा. ग्रामपंचायत, सरपंच, नोकरी करणान्या स्त्रिया, आजी-आजोबा असणा-या घरातील सदस्य, व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती यांच्याकडून मुलाखती, प्रश्नावलीद्वारे माहिती मिळविता येईल.

४. संशोधनात्मक प्रकल्प

आपणाला अनुभवास आलेल्या एखाद्या समस्येची, प्रश्नाची उकल करणे हा या प्रकल्पाचा मुख्य हेतू असतो. या प्रकल्प प्रकाराला समस्या निराकरणात्मक प्रकल्प असेही म्हणतात. सदर प्रकल्पात कार्यकारण शोधणे, योग्य प्रकल्पाची निवड करणे, निष्कर्ष काढणे, इत्यादी कौशल्ये विकसित होतात. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील माहिती वाचून पूर्णपणे समजत नाही. त्यामध्ये अनेक प्रकारच्या समस्या असतात. शंका निर्माण होत असतात. या शंकाचे व समस्यांचे निवारण आणि निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी घेतलेला प्रकल्प म्हणजेसमस्या निराकरणात्मक प्रकल्प होय, उदा. गुष्द का होतात? वी कोणामध्ये होतात? त्यांचा सर्वसामान्यांवर काय परिणाम होतो?

**१.३.५ इतिहास अध्यापनात प्रकल्प पध्दतीचा वापर**

इतिहास अध्यापनात प्रकल्प पध्दत उपयुक्त आहे. सिंधु संस्कृती दर्शन, वैदिक संस्कृती, अश्मयुगीन काळातील माहिती, शिवकालीन गुध्दकला, १८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम, पंचवार्षिक योजना, हडप्पाकालीन लोकजीवन, वैदिक साहित्य इत्यादी विषयावर सचित्र प्रकल्प करता येणे शक्य आहे

हे प्रकल्प तयार करण्यात मुलांना आनंद वाटतो. त्यासाठी ते चित्र, माहिती जमा करतात. नकाशे काढतात, वर्णने लिहितात. म्हणून या कृतीयुक्त प्रकल्प पध्दतीचा इतिहास शिक्षकाने जरूर वापर केला पाहिजे. निरनिराळया ऐतिहासिक प्रकल्पांना उपयुक्त अशी माहिती वृत्तपत्रे, नियत कालिकात प्रसिध्द होत असते. त्यांचा संग्रह शिक्षकांनी करावा व विद्यार्थ्यांना सवय लावावी म्हणजे वेळेला उपयुक्त माहिती व वृत्तपत्रे चित्रे चटकन सापडू शकतील. या फदतीमध्ये विद्यार्थ्यांची कर्णेंदिथे, ज्ञानेंदिये, बुध्दी कार्य करतात. मुलांचा विकास होऊन सामर्थ्य वाढते, कामाच्या कल्पना मुलांनी काढाव्यात व पुढाकार घेऊन त्या पूर्ण कराव्यात, हे या पध्दतीचे तत्व, त्यामुळे मुलामुलीत सहकार्य वाढीस लागते, सामाजिक जीवनात समरस

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

होण्याचे शिक्षणाचे ध्येय या पध्दतीने साध्य होते.

**१.३.६ प्रकल्प पध्दतीचे गुण**

१. ही शिक्षण पध्दती मानसशास्त्रावर आधारलेली आहे. या पध्दतीत कल्पना मुलांच्या मनातूननिघते व तिचे कार्य त्यांच्या प्रेरणेने सुरू होते. शिक्षकाची भूमिका मार्गदर्शकाची असते.

२. प्रकल्प राबविताना मुले त्यात उत्साहाने भाग घेतात, त्यासाठी ते माहिती व चित्रे जमा करतात. नकाशे काढतात. वर्णने लिहितात अशा प्रकारे प्रकल्प राबविताना विद्यार्थ्यांचा अनेक विषयांशी संबंध येतो. त्या अनुषंगाने ते क्रिया व विचार करतात. या क्रियेतून त्यांना अनुभव मिळतात व पर्यायाने तेच त्या विषयाचे त्यांचे ज्ञान बनते.

३. मुलांच्या कर्णेंद्रिये, ज्ञानेंद्रिये व बुध्दीच्या विविध अंगाना चालना मिळते.

४. स्वतः काम केल्यामुळे त्यांना आनंद पाप्ती मिळते व आत्मविश्वास वाढीस लागतो.

५. योजना म्हणजे खराखुरा व्यवहार असतो. त्यामुळे मिळालेले शिक्षण सत्य स्वरूपात असते.

६. मुलांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागते.

७. निरनिराळ्या विषयांचे ज्ञान मिळते,

८. सर्व विद्यार्थी एकत्रित काम करीत असल्यामुळे त्यांच्यात सहकार्य, सहानुभूती व सामंजस्य हे सामाजिक जीवनात आवश्यक असलेले गुण त्यांच्या अंगी बाणतात व वाढीस लागतात.

९. अनुभव व कृती यातून शिक्षण दिले जात असल्याने व्यवहारोपयोगी शिक्षण मिळते.

१०. इतर विषयांचा समन्वय साधला जातो.

**१.४ समस्या विधान**

'उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांकरिता इतिहास अध्यापनातील प्रकल्प पध्दतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**१.५ समस्येचे स्पष्टीकरण**

संशोधिकेने संशोधनासाठी "उच्च प्राथमिक स्तर म्हणजे इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांकरिता इतिहास अध्यापनातील प्रकल्प पध्दतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास या समस्येची निवड केलेली आहे. या समस्येचे संशोधनात्मक स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

**१.५.१ संशोधनाचे संकल्पनात्मक विश्लेषण**

संशोधिकेने समस्येची, समस्येच्या शीर्षकाची निश्चिती केल्यावर समस्येमधील मुख्य संकल्पनाची सविस्तर व बारकाव्यांसह माहिती समजावून घेणे फारच आवश्यक असते. त्यामुळे समस्या स्पष्ट होण्यास मदत होते. संकल्पनाशी संबंधीत बाबींचा बारकाव्यासह तपशीलवार विचार करणे म्हणजेच संकल्पनात्मक विश्लेषण होय.

संकल्पनात्मक विश्लेषणामुळे पुढील फायदे होतात.

१. संशोधन शीर्षकातील सगळ्या संकल्पनांचा परस्परसंबंध, त्यांचे परिणाम शोधणे सोयीचे होते.

२. संशोधन कार्य योग्य दिशेने पुढे नेण्यास संकल्पनात्मक विश्लेषणाची मदत होते.

३. प्रत्येक संकल्पनेचा विचार व चिंतन करून त्यांचा परस्परसंबंध लक्षात घेता येतो.

४. समस्येशी संबंधीत सर्व शक्यतांचा विचार होतो.

५. समस्येशी संबंधीत चलांचा योग्य संबंध लक्षात येतो.

संशोधिकेने घेतलेली समस्या ही इतिहास विषयाची आहे. इतिहास अध्यापनात प्रकल्प पध्दतीचा वापर करून शैक्षणिक उपलब्धीमध्ये काय फरक पडतो हे संशोधकाला जाणून घ्यावयाचे आहे.

इतिहासाचे अध्यापन म्हणजे अध्यापकांचे कथन व विद्‍यार्थ्यांचे श्रवण इतकाच अर्थ पूर्वी घेतला जात असे. त्यामुळे काही वेळा या प्रक्रियेत निरसपणा येत असे. त्यातूनच विद्‍यार्थ्यांमध्ये विषयाची नावड निर्माण होते.

याचदृष्टीने अवघड संकल्पना स्पष्ट करणे, पाठ्‍यांशासंबंधी माहिती किंवा चित्रे गोळा करणे, त्या माहितीचे सादरीकरण करणे, यातून ऐतिहासिक संकल्पना समजण्यास, याविषयी आवड निर्माण होण्यास मदत होते. अध्ययनातील गती वाढून शैक्षणिक उपलब्धी वाढते.

**इतिहास अध्यापनात येणाऱ्या समस्येचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.**

- इतिहासाचे अभ्यासक्रमाचे व्यापक रूप
- अध्यापनातील पारंपारिकता
- विद्‍यार्थ्यांना संकल्पना समजण्यास अवघड
- विषयाविषयी निरसता
- शैक्षणिक उपलब्धीत होणारी घट

**१.५.२ पारिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या**

१. इतिहास : भूतकाळातील घटनांचे कालानुक्रमे, सुसंबध्द केलेले वर्णन म्हणजे इतिहास, हे एक सामाजिक शास्त्र असून इयत्ता आठवीच्या अभ्यासक्रमात हा विषय अनिवार्य आहे.

२. अध्यापन: शिक्षकांनी नेमून दिलेला अभ्यासक्रम विद्‍यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची प्रक्रियाम्हणजे अध्यापन.

३. प्रकल्प पध्दती विद्‍यार्थ्यांनी करावयाचे एखादे शैक्षणिक कार्य ज्यामध्ये समाविष्ट आहे अशी अध्ययन कृती म्हणजे प्रकल्प होय. शिक्षणातील उपयुक्तता वाढविण्यासाठी अध्ययन अध्यापनात केलेला प्रकल्पांचा वापर म्हणजे प्रकल्प पध्दती.

४. उच्च प्राथमिक स्तरातील विद्‍यार्थी न्यू इंग्लिश स्कूल व ज्यूनिअर कॉलेज कवडदरा तालूका इगतपूरी जिल्हा नाशिक येथील इयत्ता ७ वी उत्तीर्ण झालेले व औपचारिक शिक्षण घेणारे विद्‍यार्थी,

५. परिणामकारकता प्रकल्प पध्दतीचा इतिहास विषयायच्या अध्यापनात वापर केल्याने विद्‍यार्थ्यांमध्ये

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

झालेला गुणात्मक व शैक्षणिक बदल म्हणजे परिणामकारकता होय.

**१.५.३ संशोधनाची व्याप्ती**

संशोधिकेने समस्येचा अभ्यास करण्यासाठी निवडलेल्या विषयाची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे.

१. न्यू इंग्लिश स्कूल व ज्यूनिअर कॉलेज कवडदरा तालूका इगतपूरी जिल्हा नाशिक येथील उच्च प्राथमिक शाळेतील २५ विद्यार्थ्यांचा समावेश सदर संशोधनासाठी केला आहे.

२. सदर संशोधन हे इतिहास विषयाच्या अध्यापनातील प्रकल्प पध्दतीवर आधारित आहे.

३. उच्च प्राथमिक स्तर म्हणजे इयत्ता आठवीच्या इतिहास विषयातील चार घटकावर आधारित ५ प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे.

४. सदर संशोधनासाठी मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

**१.५.४ संशोधनाची मर्यादा**

समस्येचा अभ्यास करताना पुढील मर्यादा संशोधिकेने लक्षात घेतलेल्या आहेत. न्यू इंग्लिश स्कूल व ज्यूनिअर कॉलेज कवडदरा तालूका इगतपूरी जिल्हा नाशिक येथील उच्च प्राथमिक शाळेतील २५ विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. इतर कोणत्याही शाळेची निवड करण्यात आलेली नाही.

१. सदर संशोधनासाठी न्यू इंग्लिश स्कूल व ज्यूनिअर कॉलेज कवडदरा तालूका इगतपूरी जिल्हा नाशिक येथील मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. हिंदी, इंग्रजी किंवा सेमी इंग्रजी माध्यमांचा विचार करण्यात आला नाही.

२. सदर संशोधनात उच्च प्राथमिक स्तर म्हणजेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचा समावेश केला आहे. इतर कोणत्याही इयत्तेतील विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला नाही.

३. संशोधनासाठी इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी प्रकल्प पध्दतीची निवड करण्यात आलेली आहे. इतर पध्दतींची निवड करण्यात आलेली नाही.

१.५.५ गृहितके

गृहितके' म्हणजे सत्य म्हणून स्विकारलेली वस्तुस्थिती विषयक विधाने होत. ही सत्य आहेत असे मानून त्यांना पायाभूत तत्त्वे मानले जाते किंवा असेही म्हणता येईल.-

'संशोधिकेने आपल्या संशोधन विषयासंबंधाने अनुभवावर आधारित फारशी चिकित्सा न करता आधारभूत मानलेली परिस्थिती म्हणजे गृहितके होय,'

सदर संशोधनासाठी पुढील गृहितके मांडली आहेत.

१. उच्च प्राथमिक स्तर म्हणजे इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रकल्पाविषयी माहिती आहे.

२. इतिहास विषय शिकण्यासाठी प्रकल्प पध्दतीचा उपयोग करता येतो.

**१.६ संशोधन समस्येचे महत्त्व :-**

जग एकविसाव्या शतकात पोहचले आहे. खूप झपाट्याने सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडून येत आहे.

GOEIIRJ

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

शिक्षण पध्दतीतही बदल व्हायला हवा असे नुसते म्हणून चालणार नाही. तर शिक्षण संक्रमणाचे पाईक असणारे आपण शिक्षकच आहोत हा विचार मनात आला. अध्यापनाची सामाजिक व राष्ट्रीय ध्येये, मूल्ये व उद्दिष्टे साध्य करण्यास साहाय्यभूत ठरणारी प्रक्रिया कोणती असेल तर ती अध्यापन पध्दती. अध्यापन पध्दती हे एक कर्मकांड नसून ते एक अध्यापनाचे उपयुक्त साधन म्हणून ओळखले जाते. कोणत्याही विषयाचे अध्यापन प्रभावी, अर्थपूर्ण, क्षमतापूर्वक व सफल होण्यासाठी अध्यापन पध्दतीची आवश्यकता असते.

इतिहास अध्यापनाची सर्व ठिकाणी, सर्व वर्गांना व सर्व आशयाच्या बाबतीत परिणामकारक होईल, अशी एकमेव पध्दती नाही. तर विविध पध्दती आहेत. या प्रत्येक पध्दतीचे काही फायदे आहेत. तशाच, त्याच्या काही मर्यादाही आहेत. शिक्षकाने या सर्व पध्दतीचा अभ्यास करावा त्या जाणून घेऊन प्रयत्नपूर्वक अवगत करावात व योग्य परिस्थितीतयोग्य पध्दतीचा वापर करावा, आवश्यकता असल्यास अध्यापन परिणामकारक करण्यासाठी पध्दतीत बदल करण्याचा शिक्षकास पूर्ण अधिकार असतो.

इतिहासाच्या अध्यापनासाठी वापरली जाणारी प्रकल्प पध्दती ही ज्ञानरचनावादावर आधारित आहे. या पध्दतीत अनुभव व कृती यातून शिक्षण दिले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारोपयोगी शिक्षण मिळेल. सर्व विद्यार्थी एकत्रित काम करीत असल्यामुळे त्यांच्यात सहकार्य, सहानुभूती व सामंजस्य हे सामाजिक जीवनात आवश्यक असणारे गुण वाढीस लागतील, त्याचबरोबर अध्ययनातील मनोरंजकता वाढेल. विद्यार्थ्यांच्या कर्णेद्रिय, ज्ञानेंद्रिय व बुध्दीच्या विविध अंगांना चालना मिळणार आहे. संशोधिकेने हे संशोधन करताना विविध संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला आहे. त्यामुळे हे संशोधन संशोधकाला व इतिहास विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना उपयुक्त ठरणार आहे.

विशेषतः इतिहासामार्फत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एकात्मता साध्य करण्याची जबाबदारी इतिहास शिक्षकावर येऊन पडलेली असल्याने इतिहास शिक्षकावर इतिहासाचे चांगले अध्यापन करण्याची आपोआपच जबाबदारी येऊन पडलेली आहे. निदान राष्ट्रकार्य म्हणून तरी इतिहास विषय आपण चांगला शिकवायला हवा, याचा विसर इतिहास शिक्षकांना होता कामा नये.

इतिहास हा उत्कृष्ट निवेदनाच्या कलेचा विषय म्हणून ओळखला जातो. मुलांना शिकविलेला इतिहास त्यांच्या स्मृतिपटलावरून पुसला जाणार नाही, अशी जिद्द व आकांक्षा इतिहास शिक्षकाने बाळगायला हवी. कारण इतिहासाच्या अध्यापनाची कला सतत विस्मरणावर मात करते. म्हणून इतिहास शिक्षक अध्यापनासाठी विविध पध्दतींचा वापर करीत असतो.

अभ्यासक्रमात इतिहास हा विषय अनिवार्य आहे, त्तो प्राथमिक, माध्यमिक स्तरावर अनिवार्य आहेच. परंतु स्पर्धापरीक्षांसाठी देखील तितकाच महत्त्वाचा आहे. संशोधकाला त्याच्या अभ्यासावरून असे दिसून आले आहे की हातात पुस्तक धरूनच वर्षानुवर्षे त्याच त्या यांत्रिक पध्दतीने अध्यापक शिकवतात. त्यामुळे साहजिकच निरसपणा येतो व विद्यार्थी कंटाळतात. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर होतो. म्हणजेच गुणवत्तेवर होतो. याच सर्व कारणांमुळे खडू-फळा, स्वतःच बोलत राहणे या पध्दतीत बदल करता

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

येईल का? असे संशोधकाच्या मनात आले, काळाबरोबर पुढे जाऊन प्रकल्प पध्दतीचा आधार घेऊन इतिहास विषय अध्यापनात परिवर्तन करण्याच्या दृष्टीनेच संशोधिकेने हा विषय घेता येईल का? याचा अभ्यास केला.

**१.९ समस्येशी निगडीत चले**

सदर संशोधनात खालील चलांचा विचार करण्यात आला आहे.

१. स्वाश्रयी चल: प्रकल्प पध्दतीवर आधारित अध्यापन

२. आश्रयी चल विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन.

**१.१० समारोप**

उच्च प्राथमिक स्तर म्हणजे इयत्ता आठवीत इतिहास शिकणारे विद्यार्थी व इयत्ता आठवीला इतिहास अध्यापन करणाऱ्या अध्यापक यांच्याशी हे संशोधन संबंधित आहे. इतिहासाच्या अध्ययन-अध्यपनातील समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे हे संशोधन संबंधित विद्यार्थी व शिक्षकांना उपयोगी पडेल, अशी अपेक्षा आहे.